Issue VI , Vol. I (Indexed) | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
June, 2026 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

Impact Factor – 7.139 ISSN – 2319 - 8648

Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

June, 2026
Issue- VI, Vol. I

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Editor
Dr. Vilas Surybhan Tale
Associate Professor,
Department of Political Science,
Coordinator, IQAC, Arts College Buldhana

Shaurya Publication , Latur

Issue VI , Vol. I (Indexed) | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
June, 2026 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

Index

1. A Study of Women's Political Participation in Panchayati Raj Institutions: With Special Reference to Latur District — 07
Prof**. Ajinkya Surendra Kadam, Dr. P. K. Nandeshwar**

2. A Comparative Review of the Concept of Liberty in the Political Philosophy of Isaiah Berlin, John Rawls and Robert Nozick — 13
Anshul C. Wankhede, Dr. Vedprakash Dongaonkar

3. Institutional Gender Parity and Policy Transformation: A Critical Inquiry into the Constitution (106th Amendment) Act, 2023 and Democratic Governance in India — 22
Akshay Govind Pawar Prof. Dr. Vilas S. Tale

4. Digital Governance and Last Mile Service Delivery- An Indian Context — 27
Prabodh Janardan Wankhade, Prof. Dr. Vilas Gaikwad

5. Role of Zilla Parishads in District Administration: A Study of Maharashtra — 35
Chaitanya Ashok Bagade, Dr.Vilas Gaikwad

6. Political Socialization and Democratic Citizenship in Indian Schools: A Conceptual Review — 40
Shubham Bhimrao Gawai, Prof. (Dr.) Vilas S. Tale

7. Women's Empowerment Beyond Borders: in Indian Diasporic Literature — 45
S.k. Mateen,[1] S.k. Nazeer[2]

8. अमरावती जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समितीच्या योजनांचा विकासात्मक अभ्यास — 51
भारत सिताराम डोंगरे, डॉ. विलास गायकवाड

9. लोकसभा निवडणूक २०२४ मधील दिव्यांग मतदारांचा सहभाग : बुलडाणा तालुक्याचा एक विश्लेषणात्मक अभ्यास — 60
प्रशांत आनंदा हिवाळे, प्राचार्य, डॉ. सुरेश रामभाऊ बाठे

10. कृत्रिम बुद्धिमत्तेचा लोकशाहीतील निवडणुकांवरील प्रभाव : एक संशोधनात्मक अभ्यास — 62
डॉ. विलास एस्. टाले

11. संत गाडगेबाबांच्या कीर्तनांतील सामाजिक परिवर्तनाची संकल्पना — 75
गजेंद्र सोनबा टोम्पे, डॉ. विष्णू नामदेव लांडे

12. डॉ. गंगाधर पानतावणे यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व व आंबेडकरवादी विचार — 81
कु. शुभांगी संजय चोथमल, डॉ. विष्णू नामदेव लांडे

13. 'बारोमास' या कादंबरीतील सुशिक्षितांच्या समस्या — 85
श्री विठ्ठल गणपत महाल्ले, डॉ. विष्णू नामदेव लांडे

CURRENT GLOBAL REVIEWER

Issue VI , Vol. I (Indexed) June, 2026 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

12 डॉ. गंगाधर पानतावणे यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व व आंबेडकरवादी विचार

कु. शुभांगी संजय चोथमल
संशोधक विद्यार्थीनी,
मराठी विभाग,
मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती

डॉ. विष्णू नामदेव लांडे
संशोधन मार्गदर्शक,
मराठी विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती

डॉ. गंगाधर पानतावणे हे मराठी साहित्य विश्वातील सुप्रसिध्द साहित्यिक, समीक्षक, संपादक म्हणून सर्वपरिचित आहेत. विवेकनिष्ठ विचारसरणीतून समाजाला दिशा देणारे, आंबेडकरवादी विचारांची मांडणी करणारे, आपल्या लेखणीतून समाजाला प्रगल्भ करणारे लेखक व विचारवंत म्हणून डॉ.गंगाधर पानतावणे यांची ओळख आहे. दलित साहित्यात चळवळीतील त्यांचा अत्यंत मोलाचा वाटा मानला जातो. त्यांनी धर्म, समाज, संस्कृती बद्दलची मतभेद मोडून काढले. महाराष्ट्रातील बहुतेक सर्व स्तरावर तसेच प्रवाहांमध्ये त्यांनी विविध साहित्यकृतींच्या लेखनाला प्रस्तावना लिहिलेल्या आहेत. त्यांच्या एकूणच कार्यातून व लिखाणातून मराठी विषयक आत्मनिष्ठा, आत्मीयता प्रकर्षाने जाणवते. मराठीतील साहित्यातील दलित साहित्य या प्रवाहावर त्यांनी सखोल चिंतन केलेले दिसते, म्हणूनच त्यांन दलित साहित्याचे भाष्यकार म्हणूनही ओळखले जाते. प्रस्तुत लेखामधून त्यांचे वाङ्मयीन व आंबेडकरवादी विचार याचा शोध करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

परिचय :

डॉ. गंगाधर पानतावणे यांची ज्येष्ठ साहित्यिक, समाज प्रबोधन चळवळ करणारे, विचारवंत, समीक्षक अशी ख्याती आहे. त्यांनी दलित साहित्य चळवळीसाठी मोलाची कामगिरी केली. त्यामुळेच त्यांचे योगदान हे दलित साहित्य चळवळीला कधीही विसरता येणार नाही. दलित वाङ्मयाबद्दल त्यांनी प्रभावी विचार त्यांनी मांडलेले आहेत. गंगाधर विठोबाजी पानतावणे हे त्यांचे पूर्ण नाव आहे. त्यांचा जन्म 28 जून 1937 रोजी झाला. तर त्यांचां मृत्यू हा 27 मार्च 2018 रोजी त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी मराठी विषयाचे प्रोफेसर व विभाग प्रमुख म्हणून काम केलेले आहे. तेथूनच ते निवृत्त झालेले आहेत. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेवर प्रकाश टाकणाऱ्या ' पत्रकार डॉ बाबासाहेब आंबेडकर ' या ग्रंथाचे लेखन केले. यावरच त्यांनी आपले संशोधन करून पीएच.डी. ही पदवी मिळवली. त्यांची विशेष खास बाब म्हणजे त्यांनी ही पदवी कोणत्याही मार्गदर्शकाशिवाय घेतलेली आहे. यावरून त्यांच्या संशोधन दृष्टीची कल्पना निदर्शनास येते.

वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व :

ते एक अभ्यासक, तसेच चिंतनशीलवृत्तीचे प्राध्यापक होते. पहिल्या विश्व साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. संमेलनातील भाषणे, विद्यापीठातील व्याख्याने यातून त्यांचे मौलिक व्यक्तिमत्व दिसून येते. तसेच ते पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष देखील होते. लेखकांना लिखाणासाठी आत्मबळ देणे हे त्यांच्या प्रतिमेचे एक वैशिष्ट्य दिसते. दलित साहित्य चळवळीमध्ये सहभाग घेऊन समाजामध्ये प्रबोधन केले. 1967 मध्ये अस्मितादर्श' या नियतकालिकाच्या रूपात त्यांनी प्रबोधनकारक असे व्यासपीठ तयार केले. पुढेचालून दलित साहित्याच्या चळवळीचे अस्मितादर्श हे एक स्वतंत्र असे मुखपत्र बनले. या नव्या व्यासपीठावर दलित साहित्य चळवळीला

Issue VI , Vol. I (Indexed) | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
June, 2026 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

नवीन दिशाच जणू मिळाली. अत्यंत आत्मियतेने व निष्ठेने अस्मितादर्श या नियतकालिकाची त्यांनी पायाभरणी केली. या नियतकालिकाच्या माध्यमातून दलितांच्या वेदना, त्यांच्या समस्या तसेच विविध आंबेडकरवादी लेखकांचे योगदान लाभले. यातूनच दलित साहित्य चळवळ ही उभारीला आली. डॉ गंगाधर पाणतावणे यांचे साहित्य लेखन हे वेगवेगळ्या प्रकारात प्रकारात आहे. त्यांनी नाटके, कविता, समीक्षा ग्रंथ, संशोधन पर लेख, वैचारिक लेखन, स्तंभलेखन असे विविध प्रकार हाताळून मराठी वाङ्मयात प्रकाशाचा वाटा निर्माण केल्या. त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी वैचारिक मांडणी ही परिवर्तनवादी असल्याचे दिसून येते.

डॉ. गंगाधर पानतावणे यांचे साहित्य लेखन :

डॉ. पानतावणे यांच्या लेखनामध्ये प्रामख्याने संशोधनात्मक मांडणी, लक्ष वेधून घेणारा आशय व विषय, वस्तुनिष्ठ मांडणी, परखड भूमिका असे विविध वैशिष्ट्य आढळून येतात. त्यांनी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अशा प्रकारची चर्चा केलेली दिसते. त्यांनी लेख, समीक्षा, चरित्र, संशोधनात्मक ग्रंथ लेखन केलेले आहे. सुरुवातीला त्यांनी कविता लिहिल्या. त्या कविता वृत्तपत्र या माध्यमातून प्रसिद्ध झाल्या. 'मृत्यूशाळा' (1982) हे त्यांचे पहिले नाटक आहे. याशिवाय त्यांनी 'मूल्यवेध' (1976), 'विदर्भाचे पाणी पेटले' (1976), 'दलितांचे प्रबोधन' (1978), ' वादळाचे वंशज' (१९८२), 'प्रबोधनाच्या दिशा' (1984), 'चैत्य' (1990) आणि 'साहित्य प्रवृत्ती व प्रवृत्ती' (1990) इत्यादी ग्रंथामधून त्यांच्या वैचारिक भूमिकेची मांडणी केली.

साहित्याचे स्वरूप :

'मूल्यवेध' (1976) या ग्रंथामध्ये दलित साहित्याच्या मूल्यांचा वेध यांचा समतोल वेध त्यांनी घेतलेला आहे. हा ग्रंथ विचार मूल्यांचा वेध घेणारा आहे. यामध्ये मूल्यांची तात्विक भूमिका, त्याचे स्वरूप, मर्यादा, विसंगती याबाबत परखडपणे परखडपणे घेतलेला आहे. डॉ पानतावणे यांनी बऱ्याचशा लेखांचे तसेच ग्रंथांचे चिकित्सक दृष्टीने अभ्यास केलेला आहे. यामध्ये प्रा. गो. म. रानडे यांच्या 'महाराष्ट्रातील समाज विचार' या ग्रंथाची चिकित्सा केलेली दिसून येते.

'विद्रोहाचे पाणी पेटले' (1976) यामध्ये 'अमृत' या मासिकातून लिहिलेले लेख आहेत. या ग्रंथांमध्ये त्यांनी दलित साहित्य चळवळतील निष्ठावान कार्यकर्ते, कवी, शाहीर, लेखक, विचारवंत यांचा मागोवा घेतलेला आहे. दलित साहित्यातील नव्या - जुन्या लेखकांचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये दलित साहित्याला योगदान देणारे शाहीर घेगडे, वामनदादा कर्डक, शंकरराव खरात कि. फा. बनसोडे अशा सृजनशील लेखकांचा समावेश होतो. दलितांच्या वेदना, दुःख, नकार त्यांनी आपल्या लेखनातून मांडले आहे. या ग्रंथांमध्ये वैविध्यपूर्ण लेखकाचा अभ्यास केलेला आहे. थोडक्यात आंबेडकरवादी चळवळीचा संशोधनात्मक अभ्यास या ग्रंथामध्ये दिसून येतो.

'दलितांचे प्रबोधन' (1978) हा ग्रंथ दलितांच्या विविध सामाजिक, राजकीय यासारख्या विविध समस्यांची उकल करण्याच्या या अनुषंगाने लिहिलेला ग्रंथ आहे. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये किंवा ब्रिटिशकालीन समाज व्यवस्थेमध्ये न्याय, शिक्षण, मूल्ये हे पायदळी तुडविले जात असताना, तत्कालीन काळात महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, बनसोडे यासारख्या समाजसुधारकांनी जे कार्य केले, त्याचा अभ्यास प्रस्तुत ग्रंथातून आढळतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि विविध समाजसुधारकांनी आपल्या विचारांतून व प्रत्यक्ष कृतीद्वारे जे समाज प्रबोधन कार्य केले, त्याबाबत डॉ. पानतावणे यांनी त्या त्या लेखकाच्या विचारांची मूल्यमापनात्मक चर्चा केली.

Issue VI , Vol. I (Indexed) | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
June, 2026 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

'वादळांचे वंशज' (1982) या ग्रंथामध्ये ' विद्रोहाचे पाणी पेटले आहे ' या ग्रंथाप्रमाणे दलित चळवळीतील कवी, शाहीर, लेखक, विचारवंतांचे व्यक्तिदर्शन केले आहे. यामध्ये शाहीर भीमराव कर्डक, कवी दलितानंद, कवी श्रीधर, शांगबाई दाणी, गोपाळ बाबा वलंगकर, के ना. देव उर्फ पतीत पावनदास, तुकाराम, अंबादास पुरोहित इ. लेखकांच्या विचारांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला. डॉ पानतावणे यांनी यातीन त्यांची अस्पृश्य विरोधी असलेले मते परखडपणे मांडलेली आहेत.

'प्रबोधनाची दिशा' (1984) या ग्रंथामध्ये डॉ.आंबेडकर व महात्मा फुले यांच्या चळवळी विषयी माहिती सांगितली आहे. महात्मा फुले यांनी ब्राह्मणाचे असलेले वर्चस्व, अधिकार, भाकडकथा यावर कडाडून टीका केली, परंतु ब्राह्मणांनी यांच्यावर सूड घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पानतावणे यांनी महात्मा फुले यांचे विचार स्पष्ट करून हे आरोप मोडीत काढले. तसेच या ग्रंथांमध्ये सामाजिक, राजकीय, समकालीन चळवळींचा प्रश्नांचा मागोवा घेतलेला आहे. या ग्रंथांमध्ये डॉ. आंबेडकर आणि मार्क्स यांच्या समन्वयकतेला विरोध केला.

'चैत्य' (1990) या ग्रंथामध्ये त्यांनी विविध प्रकारच्या ग्रंथांना वैशिष्ट्यपूर्ण अशा प्रस्तावना दिलेल्या आहेत. त्या प्रस्तावनेचा या ग्रंथात संग्रह आढळून येतो.. डॉ. पानतावणे यांच्या एकूणच प्रस्तावना यातून डॉ आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान व बौद्ध तत्वज्ञान यावर आधारित दिसून येतात.

समीक्षा ग्रंथ :

'साहित्य प्रवृत्ती आणि प्रवृत्ती' हा त्यांचा यांचा समीक्षा ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी वैचारिक बाजू मांडलेली आहे. यातून ब्राह्मण आणि अब्राह्मण यांच्यातील संघर्ष अधोरेखित केला.. अशा प्रकारे गंगाधर पानतावणे यांनी वैचारिक लेखन केले आहे. यामध्ये चिकित्सक, वैचारिक भूमिका दिसून येतात. पानतावणे यांचे लेखन हे लक्षवेधी, परखड तसेच स्पष्ट अशा प्रकारचे आहे. महाराष्ट्रातील ते एक सर्वोत्कृष्ट समीक्षक तसेच संपादक म्हणून परिचित आहेत.

आंबेडकरवादी विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतरानंतर 1960 च्या दशकात दलित समाज उभारू लागला. धर्मांतर नंतर दलितांचे वेदनामय जीवन, असह्य त्रास, दुःख या बाबी कमी होतांना दिसल्या. त्याचबरोबर न्याय, समानता, स्वातंत्र यामुळे ते समाजात स्वतंत्र राहू लागले. आपले विचार मते, मतांतरे मांडू लागले. असे असताना सुद्धा काही लोकांची घुसमटही होत होती, त्यांना लिहिता वाचता येण्यास मनाई होती. सत्यता, वास्तविकता दाखवता येत नव्हती. अशा विपरित परिस्थितीदरम्यान 'अस्मितादर्श' या नियतकालिकाची निर्मिती झाली. यातून दलित साहित्यिकांना हक्काचे व्यासपीठ म्हणून एक माध्यम मिळाले .त्यातून ते लिहायला लागले. आपले मत जाणिवा मांडू लागले, व्यक्त होऊ लागले. डॉ. पानतावणे यांना नेहमी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दलची कृतज्ञता असायची. डॉ आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान त्यांनी नेहमीच मांडले. दलित साहित्य चळवळीचे मुख्य प्रेरणा ही आंबेडकरवादी विचारच असस्याचे त्यांनी ठासून सांगितले.. त्यांनी आंबेडकरवादी दलित साहित्याला, मराठी साहित्याला नवे जीवन व संस्कृती देण्याचे महान कार्य दिले. याविषयी त्यांनी दशसूत्री सांगितलेली दिसून येते. डॉ पानतावणे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रावर प्रबंध सादर केला. तो प्रबंधसुद्धा एका मार्गदर्शकाशिवाय पूर्ण केला, हे त्यांचे एक वेगळेपण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन विचाराचा गाभा त्यांनी जोपासला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर बद्दल विचार करताना त्यांनी म्हटले " विसाव्या शतकात बाबासाहेब यांचे झुंजार व झंजावती नेतृत्व आहे आणि आम्ही मानसिक क्रांतीला सिद्ध झालो " डॉ.पानतावणे यांनी आपले साहित्यिक विचार प्रकट केले आहेत आणि त्यांनी वेगवेगळ्या वाङ्मयीन प्रवाहामध्ये ग्रंथ लेखन केले आहे. जे ग्रंथ लेखन केले आहे ते

Issue VI , Vol. I (Indexed) June, 2026	Peer Reviewed SJIF Impact factor	ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

वैचारिक आणि मार्गदर्शनीय असे साहित्यिक लिहिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार प्रेरणेतून त्यांनी दलित साहित्याची चळवळ निर्माण केली आहे. आंबेडकरी विचार, साहित्य, समाज आणि संस्कृती, दलित साहित्याची त्रिसूत्री, आजची मराठी समीक्षा, दलित आणि ग्रामीण वाङ्मय, इतिहास पुनर्लेखन, संत साहित्य, संशोधनपर साहित्य, अशा विविध घटकांची चर्चा त्यांनी केली आहे. दलित साहित्याच्या निर्मितीपासून ते त्या साहित्याचे लेखक आहेत. अनेक दलित लेखकांच्या पिढ्यांना प्रकाश दाखवणारे संपादक म्हणून डॉ. गंगाधर पानतावणे आणि 'अस्मितादर्श' ची ओळख आज साऱ्या महाराष्ट्राला आहे. म्हणूनच दलित साहित्याचे अर्ध्वयू म्हणून त्यांचा गौरवाने उल्लेख करावा लागतो. त्यांच्या या कार्याची भारत सरकारने धकल घेत त्यांना 26 जानेवारी 2018 रोजी पद्मश्री पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

निष्कर्ष

1. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वाङ्मयीन प्रेरणेतून त्यांनी वाङ्मयीन कार्य केलेआहे.
2. मराठी साहित्याला त्यांचे मूल्यात्मक योगदान या सगळ्यांमधून दिसून येते.
3. डॉगंगाधर पानतावणे यांनी लेखणीची सुरुवात कवितेने केली असून, समीक्षात्मक, संशोधनात्मक आणि वैचारिक लेखन मराठी साहित्याचे चिंतनात्मक अशी मांडणी आहे.

संदर्भग्रंथ

1. जाधव मनोहर, केशव देशमुख, ऋषिकेश कांबळे - " साहित्य समाज आणि संस्कृती"
2. पानतावणे गंगाधर - दलित वैचारिक वाङ्मय, मुंबई विद्यापीठ प्रकाशन